**आर बी आय**
**परकीय चलन विभाग,**
**मध्यवर्ती कार्यालय**
**मुंबई. ४००००१**

**आरबीआय/२००४-२००५/४०२**
**ए. पी.(डीआयार मालिका) परिपत्रक क्रमांक ३८**

३१ मार्च २००५

प्रति,
परकीय चलनाशी संबंधीत व्यवहाराची परवानगी असलेल्या सर्व बँका,

माननीय महोदय/महोदया,

**भारतीय नागरीकांसाठी २५ हजार डॉलर्सची उदारीकृत प्रेषण योजना**

४ फेब्रुवारी २००४ च्या ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्रमांक ६४ च्या ३.४(iii) परिच्छेदाकडे परकीय चलनाशी संबंधीत व्यवहाराची परवानगी असणाऱ्या सर्व बँकानी कृपया लक्ष द्यावे.

या परिच्छेदानुसार, वित्तिय कृती दलानं कुक आयलंड, इजिप्त, ग्वाटेमालाम, इंडोनेशिया, म्यानमार, नौरु, नायजेरिया, फिलीपाईन्स तसेच युक्रेन या देशांना अ-सहकारी देश म्हणून घोषित केले आहे. त्यामुळे प्रेषण योजनअंतर्गत या देशांशी प्रत्यक्ष किवा अप्रत्यक्ष व्यवहार करता येणार नाहीत याची संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी.

२. या संदर्भात, परकीय चलनाशी संबंधीत व्यवहारांची परवानगी असणाऱ्या बँकांनी वर उल्लेख केलेल्या देशांशी तसेच प्रदेशांची यादी तयार करुन ती वेळोवेळी अद्ययावत करावी म्हणजे त्यांच्या उदारीकृत प्रेषण योजने अंतर्गत व्यवहार करणाऱ्या शाखांना त्यावर योग्य ती कृती करता येईल. वित्तिय कृती दलाने अ-सहकारी देशांच्या यादीत कुठल्या प्रदेशांचा समावेश केला आहे याची अद्ययावत माहीती जाणून घेण्यासाठी त्यांना www.fatf-gafi.org या संकेत स्थळाला भेट देता येईल.

३. परकीय चलनाशी संबंधित व्यवहार करणाऱ्या बँकांनी आपल्या शाखांना, तसेच, आपल्या या योजनेशी संबंधीत ग्राहकांना या परिपत्रकात देण्यात आलेली माहिती पुरवावी.

४. या परिपत्रकात देण्यात आलेली माहिती, १९९९ च्या (१९९९/४२) परकीय चलन व्यवस्थापन अंतर्गत, कसलीही परवानगी किंवा मंजुरी घ्यायची असेल तर त्यासाठी याची आडकाठी होणार नाही अशा कायद्याच्या १०(४) तसेच ११(१) या कलमांखाली जारी करण्यात आली आहे. कुठल्याही कायद्यानुसार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**आपला विश्वासू,**
**एफ़. आर. जोसेफ़,**
**मुख्य महाव्यवस्थापक**